**दिनांक :- २७/०६/२०२०**

### १.भाग ५ गुन्हयाबाबत

| | |
|---|---|
| पोलीस स्टेशन | बडनेरा |
| अपराध क्रमांक व कलम | ४३९/२०२० कलम ४५७,३८० भा.द.वि. |
| फिर्यादी नाव व पत्ता | नितीन गजानन गावंडे वय ३२ वर्ष व्यवसाय–खाजगी नौकरी रा. व्यंकटेश बालाजी नगर प्लॉट नं. ४४ यवतमाळ रोड बडनेरा जि.अमरावती |
| घटनास्थळ | व्यंकटेश बालाजी नगर प्लॉट नं. ४४ यवतमाळ रोड बडनेरा |
| घटना ता. वेळ | २०/०६/२०२०ते दि. २६/०६/२०२० |
| दाखल ता. वेळ | २६/०६/२०२०चे २३:२१ वाजता |
| आरोपी नाव व पत्ता | अज्ञात |
| गेला माल | पॅनसॉनिक कंपणीचा टि.व्ही.किमंत अंदाजे ५,०००/— , देवघरात ठवलेले चांदीचे शिक्के कि.अं.६००/— रू , नगदी २,०००/— रू ,तसेच किराणा सामान १०००/— रू असा एकुण ८,६००/— रू चा माल |
| हकीकत | हकीकत अशा प्रकारे आहे की नमुद घटना ता वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी हे त्याचे कुंटुबासह सासरवाडी शुभम कॉलनी कठोरा अमरावती येथे घराला कुलुप लावुन गेले असता. घरा शेजारी राहणारी सौ.प्रिया बंशी यांनी फिर्यादीला फोन लावुन कळविले की तुम्हचे घराचे कुलुप तुटलेले आहे चोरी झाल्या सारखे वाटत आहे. वरून फिर्यादी हे घरी आले असता त्यांना घराचे कुलुप तुटलेले दिसले. घरातील हॉलमधील पॅनसॉनिक कंपणीचा टि.व्ही. किमंत अंदाजे ५,०००/— रू तसेच देवघरात ठवलेले चांदीचे शिक्के कि.अं.६००/— रू तसेच नगदी २,०००/— रू तसेच किराणा सामान १०००/— रू असा एकुण ८,६००/— रू चा माल कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेला आहे अशा फिर्यादी चे जबानी रिपोर्ट वरून सदरचा गुन्हा दाखल करून तपासात घेतला. |
| तपास अधिकारी | म.सपोनि गुल्हाणे पो.स्टें.बडनेरा अमरावती शहर. |

### २.भाग ५ गुन्हयाबाबत

| | |
|---|---|
| पोलीस स्टेशन | पोलीस स्टेशन फ्रेजरपुरा , अमरावती शहर |
| अप क्र. व कलम | अप.क्र.५८९/२०२० कलम ३६३ भादवी |
| फिर्यादि नाव व पत्ता | अशोक किसनराव देशमुख वय ४० वर्ष धंदा-मजुरी,रा.वडरपुरा महात्मा फुले सभागृहाजवळ अमरवती |
| घटनास्थळ | वडरपुरा महात्मा फुले सभागृहाजवळ अमरवती |
| घटना ता. वेळ | दि.२५.०६.२०२० चे रात्री ११.०० वा .पासुन ते दि.२६.०६.२०२० चे सकाळी ०५.०० वा पावेतो . |
| दाखल ता. वेळ | दि.२६.०६.२०२० चे ०७.४७ वा |
| आरोपी | आकाश विठ्ठल शिंदे वय २५ वर्ष रा.वडरपुरा महात्मा फुले सभागृहाजवळ अमरवती |
| हकीकत | हकिकत अशा प्रकारे आहे की, फिर्यादी हा वरील पत्यावर त्याचे कुटुंबासह राहनारा असुन त्यास १ मुलगा १ मुलगी वय १४ वर्ष व ती न्यु गोल्डन स्कुल मोती नगर अम.येथे ८ व्या वर्गात शिकत आहे दि.२५.०६.२०२० रोजी रात्री ११.०० वा फिर्यादि हा त्याची पत्नी व आई वडिल मुलांसह जेवन करुन झोपला व दि.२६.०६.२०२० रोजी सकाळी ०५.०० वा फि.चे वडिल किसनराव देशमुख यांचे कडुन माहीती मिळाली की,वडिल झोपेतुन उठले असता फि.ची मुलगी हि दिसुन आली नाही . आम्ही तिचा भरपुर शोध घेतला असता ती मिळुन आली नाही.तसेच मोहल्यातील आकाश विठ्ठल शिंदे वय २५ वर्ष हा सुध्दा घरातुन निघुन गेला असे समजले .फि.ची मुलगी हिने घरातील तिचे वापरायचे दोन ते तिन ड्रेस ,आधारकार्ड व तिचे उपयोगी सामान सोबत नेले आहे .तिचे वर्णन - रंग गोरा उंची ५ फुट , शरिरबांधा सळपातळ ,अंगात लाल रंगाचे जॅकेट ,गुलाबी स्लॅंक्स घातलेली असुन तिला आकाश विठ्ठल शिंदे याने फुस लावुन पळुन नेले असल्याचे संशय आहे.अशा फिर्यादिचे जबानी रिपोर्ट वरुन कलम ३६३ भादवी प्रमाने दाखल करुन तपासात घेतला. |
| तपासी अधिकारी | पो.उप.नि.मंठाले पो.स्टे फ्रेजरपुरा अमरावती |

### ३.भाग ५ गुन्हयाबाबत

| | |
|---|---|
| पोलीस स्टेशन | पोलीस स्टेशन फ्रेजरपुरा , अमरावती शहर |
| अप क्र. व कलम | अप.क्र.५९१/२०२० कलम २७९, ३३७ भादवी |
| फिर्यादि नाव व पत्ता | एक महीला |
| घटनास्थळ | पुनम प्लायवुड समोरील रोडवर मोती नगर अमरावती |
| घटना ता. वेळ | दि.२६.०६.२०२० चे १४.०० वा. दरम्यान |
| दाखल ता. वेळ | दि.२६.०६.२०२० चे १८.४७ वा |
| आरोपी | MH २७ AE ३८०७ चा चालक |
| हकीकत | हकिकत अशा प्रकारे आहे की, यातील फिर्यादी ही त्याचे पती सोबत मोटर सायकल वरुन घरी जात असतांना नमुद घ. ता .वेळी व ठीकानी समोरुन येणाऱ्या MH २७ AE ३८०७या मोटर सायकल चालकाने त्याचे वाहन भरधाव वेगाने व निष्काळजिपणाने चालवुन फिर्यादीच्या मोटर सायकलला समोरुन धडक मारली व तो तेथुन पळुन गेला त्यामुळे फिर्यादीचे डाव्या हाताला मुक्का मार लागला व त्याचे पतीने त्यांचा खाजगी दवाखाण्यात इलाज केला अशा फिर्यादिचे जबानी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल करुन तपासात घेतला. |
| तपासी अधिकारी | स.पो.उप नि. सुरेंद्र ढोके ब. नं. ६१८ पो.स्टे फ्रेजरपुरा अमरावती |

## ४.भाग ५ गुन्हयाबाबत

| | |
|---|---|
| पोलीस स्टेशन | पोलीस स्टेशन फ्रेजरपुरा , अमरावती शहर |
| अप क्र. व कलम | अप.क्र.५९२/२०२० कलम २९४, ५०६ (ब) भादवी |
| फिर्यादि नाव व पत्ता | एक महीला |
| घटनास्थळ | देवि नगर अमरावती |
| घटना ता. वेळ | दि.२६.०६.२०२० चे ०९.०० वा. दरम्यान |
| दाखल ता. वेळ | दि.२६.०६.२०२० चे २०.४२ वा |
| आरोपी | १.अश्विन अंबादास शेरेकर , २) अश्विन ची पत्नी , ३) अश्विन ची आई,४) अश्विन चा भाचा आकाश सर्व रा. , देवि नगर अमरावती |
| हकीकत | हकिकत अशा प्रकारे आहे की, यातील फिर्यादी व आरोपी हे एकाच मोहल्यात राहत असुन नमुद आरोपीनी या अगोदर फिर्यादीच्या घराच्या पाठीमागच्या सर्विस गल्ली मध्ये राप्टा टाकल्यामुळे पाणी अडले होते. त्यामुळे फिर्यादी यांनी म.न.पा. येथे तक्रार केली होती. नमुद घ. ता. वेळी व ठीकानी नमुद आरोपीतांनी पुन्हा सर्विस गल्लीमध्ये रेती टाकली त्यामुळे गल्लीमध्ये पाणी अडले होते नमुद फिर्यादी हा आरोपी क्र. १ याला समजाविण्या करिता गेले असता आरोपी क्र. १ याने फिर्यादीला अश्लिल शिवीगाळ केली व आरोपी क्र. २,३,४ यांनी सुध्दा तुला साल्या पावड्यांनी मारुन टाकतो तु म.न.पा. मध्ये रिपोर्ट कसा केला असे म्हणुन अश्लिल शिवीगाळ करुन पावड्याने जिवाने मारण्याची धमकी दिली अशा फिर्यादिचे जबानी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल करुन तपासात घेतला. |
| तपासी अधिकारी | स.पो.उप नि. सुरेंद्र ढोके ब. नं. ६१८ पो.स्टे फ्रेजरपुरा अमरावती |

## ५.भाग ५ गुन्हयाबाबत

| | |
|---|---|
| पोलीस स्टेशन | पोलीस स्टेशन फ्रेजरपुरा , अमरावती शहर |
| अप क्र. व कलम | अप.क्र.५९३/२०२० कलम ३२४ भादवी |
| फिर्यादि नाव व पत्ता | संजु हरीभाऊ गायगोले वय ५० वर्ष धंदा - भाजीपाला रा. यशोदा नगर नं. २ अमरावती |
| घटनास्थळ | फ्रेजरपुरा सिद्धार्थ क्रीडा मंडळ जवळ अमरावती |
| घटना ता. वेळ | दि.२६.०६.२०२० चे १५.०० वा. दरम्यान |
| दाखल ता. वेळ | दि.२६.०६.२०२० चे २१.३२ वा |
| आरोपी | पवन बन्सोड रा. फ्रेजरपुरा अमरावती |
| हकीकत | हकिकत अशा प्रकारे आहे की, यातील नमुद घ. ता. वेळी व ठीकानी नमुद फिर्यादी व त्याची पत्नी सुनिता घरी असतांना मोहल्यातील काही मुले यांनी घरी येवुन सांगीतले कि, यश गायगोले याला चिकन विक्री करणारा पवन बन्सोड रा. फ्रेजरपुरा अम. याने काठीने मारहान केली आहे. व तो सिद्धार्थ मंडळ जवळ पडला आहे. वरुन फिर्यादी व त्याची पत्नी तेथे गेले असता त्यांचा मुलगा यश गायगोले हा पडला दिसला व त्याचे डाव्या कानाच्या मागे व उजव्या डोळयाचे वर मार लागला आहे. वरुन त्यास इलाजाकरिता ईर्विन दवाखाना येथे घेवुन गेलो अशा फिर्यादिचे जबानी रिपोर्ट व मेडी. सर्टी वरुन सदरचा गुन्हा दाखल करुन तपासात घेतला. |
| तपासी अधिकारी | स.पो.उप नि. सुरेंद्र ढोके ब. नं. ६१८ पो.स्टे फ्रेजरपुरा अमरावती |

## ६. भाग १ ते ५ गुन्ह्याबाबत

| | |
|---|---|
| पोलीस स्टेशन | नागपुरी गेट |
| अप क्र. व कलम | २१८/२०२० कलम ३२४,५०४ भादवी |
| फिर्यादी नाव व पत्ता | प्रशांत विलासराव वाघ वय २३ वर्ष रा कुंड सर्जापुर अमरावती |
| घटनास्थळ | गौठाण कुंड सर्जापुर अमरावती |
| घटना. ता .वेळ | २६/६/२०२० चे १०.०० वा |
| दाखल .ता. वेळ | २६/६/२०२० चे १२.४८ वा |
| आरोपी | रामेश्वर गोंडाणे कुंड सर्जापुर अमरावती |
| हकिकत | हकीकत अशा प्रकारे आहे की ,नमुद घटना ता वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी यांचे गाई गौठाण कडे चरण्याकरीता नेत असतांना येते हजर असलेले गुराखी आरोपी नामे रामेश्वर गोंडाणे कुंड सर्जापुर अमरावती याने गाईच्या चरइच्या महिन्याचे पैसे मागितले असता फिर्यादीने म्हटले की ,तुझा महिना भरायचा आहे नंतर देतो या कारणावरुन आरोपीने वाद करुन शिवीगाळ केली व जवळील धारधार ब्लेडने फि चे डाव्या हाताचे मनगटा खाली मारुन जख्मी केले रक्त निघाले फि. चे जबानी रिपोर्ट वरुन व मेडी सर्टि. वरुन सदरचा गुन्हा दाखल करुन तपासात घेतला. |
| तपास अधिकारी | ASI संजय बाळापुरे ब.न ६१७ पो स्टे ना गेट अम शहर |

## ७.भाग १ ते ५ गुहयाबाबत

| | |
|---|---|
| पोलीस स्टेशा | वलगांव |
| अप क्र. व कलम | ४२५/२०२० कलम ३७९,५११,३४ भादवी |
| फिर्यादि नाव व पत्ता | अविनाश भिमराव तरमळे वय २२ वर्ष रा.वंडली |
| आरोपी . | १)अजमद खाँ जमशीद खाँ वय २८ वर्ष रा. हातखेडा.२)सईद खाँ उमर खाँ वय ३५ वर्ष रा.हातखेडा ३)ईब्राहीम खाँ जमशीद खाँ वय ४० वर्ष ४)गणेश दिपक चव्हाण वय २० वर्ष ५)आकाश सुधीर चव्हाण य २० वर्ष ६)मच्छींद्र प्पु पवार वय २४ वर्ष रा धामणा दर्यापुर ७)ईस्माईलखाँ जमशीद जमशीद खाँ वय ४५ वर्ष रा. हातखेडा. |
| घटनास्थळ | ग्राम वंडली |
| घटना.ता.वेळ | २६/०६/२०२० चे ०१/०० वाजता सुमारास |
| दाखल ता.वेळ | २६/०६/२०२० चे ०३/५९ वाजता |
| हकिकत | हकीकत अशा प्रकारे आहे की. नमुद घटना ता वेळी व ठिकानी यातील फिर्यादीचे घरा समोर बांधलेले जनावरे यातील आरोपींनी संगनमत करुन जनावरे सोडुन चोरुन नेतांना मिळुन आले.अशा फिर्यादीचे जबानि रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल करुन तपासात घेतला. |
| तपासी अधिकारी | पोहेकाँ गजानन रेवसकर ब.न.७२२ पो स्टे वलगांव |

## ८.भाग १ ते ५ गुहयाबाबत

| | |
|---|---|
| पोलीस स्टेशा | वलगांव |
| अप क्र. व कलम | ४२७/२०२० कलम ३२६,३४१,२९१,२९४,५०६(ब),३४भादवी |
| फिर्यादि नाव व पत्ता | एक महीला |
| आरोपी . | १)विनोद शंकरराव मेश्राम वय ४० वर्ष २)एक महीला वय ३५ वर्ष ३)एक महीला वय ३५ वर्ष तिन्ही रा. बुधवारा चौक शिराळा |
| घटनास्थळ | बुधवारा चौक शिराळा |
| घटना.ता.वेळ | २६/०६/२०२० चे १८/०० वा सुमारास |
| दाखल ता.वेळ | २६/०६/२०२० चे २१/५० वाजता |
| हकिकत | हकीकत अशा प्रकारे आहे की, यातील फिर्यादी व आरोपी हे एकमेकांचे नातेवाईक असुन रस्त्यात त्यांची म्हैस बांधतात व सार्वजनिक उपद्रव निर्माण करतात.त्या वरुन वाद आहे नमुद घटना ता वेळि व ठिकानी याच कारणावरुन फिर्यादी व आरोपी मधे वाद झाल्याने आरोपीतांनी संगणमत करुन आरोपी क्रं. १ याने फि.चे मुलास दगडाने हाता पायावर मारुन जबर जखमी केले.आरोपी क्रं. २ हिने फि स लाता बुख्यांनी मारहान करुन अश्लील शिवीगाळ केली. व आरोपी क्रं. ३ याने फि.व त्यांचे मुलास काठीने मारले.व सर्व आरोपीतांनी फि.व त्यांचे कुटुंबाला जिवे मारण्याची धमकी दिली. अशा फि.चे जबानि रिपोर्ट वरुन व डाँ सा याचे मेडी सर्टि वरुन सदरचा गुन्हा दाखल करुन तपासात घेतला. |
| तपासी अधिकारी | पोहेकाँ सुनील मेटकर ब.न.१२१९ पो स्टे वलगांव |

## ९.भाग १ ते ५ गुन्हयाबाबत

| | |
|---|---|
| पोलीस स्टेशन | राजापेठ |
| अप क्र. व कलम | अप क्र ४२१/२० कलम ३२४ भा.दं.वि. |
| फिर्यादि नाव व पत्ता | अजय किसनराव भीडाणे वय ४० वर्ष, रा. राजापेठ गोपाल टाँकीज समोर , अमरावती |
| घटनास्थळ | गोपाल टॉकीज समोर राजापेठ अमरावती |
| घटना ता. वेळ | २४/६/२०२० चे २३.३० वा. |
| दाखल ता. वेळ. | २६/६/२०२० चे १४.२६ वा. |
| आरोपी | श्रृतीक रवी बागडे वय २० वर्ष, रा. राजापेठ गोपाल टाँकीज समोर अमरावती |
| हकिकत | हकीगत थोडक्यात अशा प्रकारे आहे की, यातील नमुद घटना ता. वेळी व ठिकाणी यातील फिर्यादि याने आरोपीस तु गाडी आरामशीर चालवीत जा असे म्हटल्याने याच कारणावरुन यातील आरोपीने त्याचे घरी जावुन लोखंडी पावडे आणुन फि.च्या डोक्यावर व नाकावर मारुन फिर्यादिस जखमी केले. अशा फिर्यादीचे डि.डि.बयान वरुन सदरचा गुन्हा दाखल करुन तपासात घेतला. |
| तपासी अंमलदार | सपोनि गजानन मेहत्रे, पो.स्टे. राजापेठ |

## १०.भाग १ ते ५ गुन्हयाबाबत

| | |
|---|---|
| पोलीस स्टेशन | राजापेठ |
| अप क्र. व कलम | अप क्र ४२२/२० कलम ३७९ भा.दं.वि. |
| फिर्यादि नाव व पत्ता | निखील देवीदास वावगे वय २१ वर्ष रा. भारतीय काँलनी दस्तुर नगर अमरावती |
| घटनास्थळ | युवा स्वाभीमान पार्टी कार्याल्य राजापेठ अमरावती |
| घटना ता. वेळ | २१/६/२०२० चे १७/३०वा.ते दि. २२/६/२०२०चे १२.३०वा. दरम्यान |
| दाखल ता. वेळ. | २६/६/२०२० चे १५/४७ वा. |
| आरोपी | अज्ञात |
| हकिकत | हकीगत थोडक्यात अशा प्रकारे आहे की, यातील नमुद घटना ता. वेळी व ठिकाणी यातील फीर्यादी हे कार्यालय बंद करुन घरी गेले व दुसरे दिवशी कार्यालयात आले असता आँफीसमध्ये काम करणा-या मुलास कार्यालयाचे टेरीसवर खुल्या जागेत लावलेला ड्रूँडींग कंपनीचा एसी. चा बाँक्स कि. अं. १५००० रु. चा माल दिसला नाही तो कोणीतरी अज्ञात चोराने चोरुन नेला अशा फि. चे जबानी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा नोंद करून तपासात घेतला. |
| तपासी अंमलदार | पोउपनि दत्ता नरवाडे पो.स्टे. राजापेठ |

## ११. भाग १ ते ५ गुन्हयाबाबत

| | |
|---|---|
| पोलीस स्टेशन | सिटी कोतवाली |
| अप क्र. व कलम | अप क्र. 186/2020 कलम ४२०,४६८,४७१,५११,३४ भादंवि |
| फिर्यादि नाव व पत्ता | ज्ञानेश्वरराव गोविंदराव अलुते वय ५५ वर्ष धंदा नोकरी (अधिक्षक म.न.पा. अमरावती ) रा. म.न.पा. कार्यालय अमरावती. |
| घटनास्थळ | म.न.पा. अमरावती. |
| घटना ता. वेळ | दि. २६/६/२०२० पुर्वी |
| दाखल ता. वेळ | दि. २६/६/२०२० चे १८.४२ वा. |
| आरोपी | १.संदिप रायकवाड कंत्रीटी लिपिक दक्षिण झोन क्र. ४ बडनेरा , २) अनुप सावरवान कनिष्ठ लिपिक लेखा विभाग म. न.पा. कार्यालय अमरावती . |
| हकिकत | हकीकत अशा प्रकारे आहे की यातील घटना ता. वेळी व ठिकाणी फिर्यादी स्वच्छ महाराष्ट्र अभियान नागरीक अंतर्गत दक्षिण प्रभाग ४ बडनेरा क्षेत्रातील स्वच्छता गृह बांधणी संबंधित देयकाच्या खालील तीन बस्ती मंजुर स्तरावर सादर करण्यात आल्या दक्षिण प्रभाग बडनेरा कडुन प्रति स्वच्छता गृह रू. १७,०००/- रू. प्रमाणे तीन देयक मंजुर स्तरावर प्राप्त झाली होती देयक नस्ती सादर केलेला खालील प्रमाणे , अनु क्र. १) देयक नस्ती सादर केलेला दि. २६/२/२०२० स्वच्छता गृहाची संख्या १६९ देयक रक्कम प्रति स्वच्छता गृह रू. १७,०००/- प्रमाणे २८,७३,०००/- रू. अनु. क्र. २ ) देयक नस्ती सादर केलेला दि. २८/२/२०२० स्वच्छता गृहाची संख्या १४९ देयक रक्कम प्रति स्वच्छता गृहे एकुण २५,३३,०००/- रू. अनु. क्र. ३ ) देयक नस्ती सादर केलेला दि. २४/३/२०२० स्वच्छता गृहाची संख्या १२२ देयक रक्कम प्रति स्वच्छता गृहे एकुण २०,७४,०००/- रू. एकुण स्वच्छता गृहाची संख्या ४४० देयक रक्कम ७४,८०,०००/- रू. वरिल देयकाबाबत शंका निर्माण झाल्यास सदर प्रकरणाची प्राथमिक चौकशी श्री. विजय खोराटे उपायुक्त सामान्य म.न. पा. अमरावती यांची चौकशी केली व चौकशी दरम्यान देयकाची सत्यता पडताळणी साठी टिपणी देयके व इतर दस्ताएवज पडताळणी शिक्का व स्वाक्षरी बाबत चौकशी अधिकारी यांनी सर्व संबंधित अधिकारी यांना त्यांचे म्हणणे व लेखी खुलासा सादर करण्यास सांगितले तर सर्व संबंधित अधिकारी यांनी देयक वरिल पदनामाचा शिक्का व सही यांची नसल्याचे लेखी खुलासा सादर केला व देयक मंजुरी स्तरावर प्रसातावित केले नाही व प्राथमिक चौकशी अनुसार वरिल दिन्ही देयक क्र. १) संदीप रायकवाड कंत्राटी लिपिक दक्षिण झोन क्रमांक ४ बडनेरा यांनी देयकावरिल त्रुटी पुर्ततेसाठी स्वत: कडे घेवुन गेल्यामुळे व परत व्यक्तीशी सादर केले असल्याचे दिसुन आल्याने प्राप्त खुलाश्यात अनुषगोने खोटी व बनावट स्वाक्षरीने सादर केली व त्यास अप्रत्यक्षरित्या अनुप सारवान कनिष्ठ लिपिक लेखा विभाग म. न. पा. अमरावती याने सहकार्य केल्याचे दिसुन येत आहे. तरी सदरची कायवाही संगणमताने केल्याची शंका असल्याने त्याचे विरूध्द कार्यवाही व्हावी अशा फिर्यादीचे लेखी रिपोर्ट वरून सदरचा गुन्हा दाखल करून तपासात घेतला. |
| तपासी अधिकारी | पो. उप. नि. श्रीकांत नारमोड, पो. स्टे. सिटी कोतवाली अमरावती |

## १.भाग -६- गुन्ह्याबाबत

| | |
|---|---|
| पोलीस स्टेशन | गाडगे नगर, अमरावती शहर |
| अप क्र. व कलम | अप क्र ५१७/२०२० कलम २८३ भादवी |
| फिर्यादि नाव व पत्ता | ASI दयाराम गुलाबराव राठोड ब.न. ६९८ पोस्टे.गाडगेनगर अमरावती |
| घटनास्थळ | हर्षरृज कॉलणी बसस्टॉप अमरावती |
| घटना ता. वेळ | २५.०६.२०२० चे २२.५५ वा |
| दाखल ता. वेळ | २६.०६.२०२० चे १.३८ वा |
| आरोपी | MH २७ BF ०२४८ चा चालक |
| हकिकत | हकीकत अशा प्रकारे आहे की, नमुद घटना ता वेळी व ठिकाणी यातील सरतर्फे फिर्यादी यांची पोस्टेचे CR -२ गाडीवर पैर्टोलींग डयुटीवर असतांना कंन्ट्रोलरुमचे कॉलवर हर्शराज बस स्टॉपवर पोहचले असता एक चारचाकी गाडी क्र. MH २७ BF ०२४८ हि रस्ताचे मधोमध उभी करुन लोकांच्या जिवीतास व सुरक्षितेस धोका निर्माण होईल व वाहतुकीस अडथळा निर्माण होईल अशा बेताने सदर गाडी लावली. वरुन अशा फिर्यादीच्या लेखी रिपोर्ट वरून सदरचा गुन्हा दाखल करून तपासात घेतला. |
| तपासी अधिकारी | मसपोनि. पुजा खांडकेर पोस्टे. गाडगेनगर अमरावती |

## २.भाग -६- गुन्ह्याबाबत

| | |
|---|---|
| पोलीस स्टेशा | वलगांव |
| अप क्र. व कलम | ४२६/२०२० कलम २९४,३२३,५०६ भादवी |
| फिर्यादि नाव व पत्ता | अरुण श्रीराम थेटे वय ४९ रा. कोळीपुरा खारतळेगांव |
| आरोपी . | अजय समाधान थेटे वय ३० वर्ष रा. खारतळेगांव |
| ०घटनास्थळ | ग्राम खारतळेगांव |
| घटना.ता.वेळ | २६/०६/२०२० चे १५/३० वा सुमारास |
| दाखल ता.वेळ | २६/०६/२०२० चे १७/५९ वाजता |
| हकिकत | हकीकत अशा प्रकारे आहे की, यातील फिर्यादी व आरोपी हे एकमेकांचे नातेवाईक असुन शेजारी शेजारी राहतात यातील आरोपी हा दारु पिण्याचा सवयीचा असुन नमुद घटना ता वेळी व ठिकानी यातील आरोपी याने फिर्यादीस दारु पिण्या करीता पैसे मागीतले असता फिर्यादीने माझे कडे पैसे नाही असे म्हटले असता यातील आरोपी याने फिर्यादीस शिवीगाळ करुन चापटा व बुख्यांनी मारहान केली व मारण्याची धमकी दिली अशा फिर्यादीचे जबानि रिपोर्ट व मेडी सर्टि वरुन सदरचा गुन्हा दाखल करुन तपासात घेतला. |
| तपासी अधिकारी | पोहेकॉ सुनील मेटकर ब.न.१२१९ पो स्टे वलगांव |

## १.प्रोव्हीबीशन

| | |
|---|---|
| पोलीस स्टेशन | बडनेरा |
| अपराध क्रमांक व कलम | ४३८/२०२० कलम ६५ (ई) महा. दारूबंदी कायदा सहकलम १८८, २६९, २७० भादवि अन्वये |
| फिर्यादी नाव व पत्ता | सरतर्फे नापोकॉ संतोष रामलाल यादव ब.नं. १८८ पोलीस स्टेशन बडनेरा अमरावती |
| घटनास्थळ | अलमास गेट जु.व.बडनेरा |
| घटना ता. वेळ | २६/०६/२०२० चे १३:४० वाजता |
| दाखल ता. वेळ | २६/०६/२०२० चे १६:४६ वाजता |
| आरोपीचे नाव व पत्ता | शकिल खान वल्द इब्राहीम खान वय ३० वर्ष रा. रा. कुरेशी नगर न.व.बडनेरा जि.अमरावती |
| हकीकत | सदर गुन्हयाची हकीकत अशा प्रकारे आहे की, नमुद घटना ता वेळी व ठिकाणी यातील नमुद आरोपीवर जप्ती पंचनाम्यातील पंचा समक्ष प्रोव्हीशन रेड केला असता नमुद आरोपीचे ताब्यातुन अवैध्य रित्या विनापरवाना देशी दारू बॉबी संत्रा १८० एम. एल. च्या २० नग ज्याची किमंत १०४०/— रूपयाचा माल पंचा समक्ष जप्त करुन ताब्यात घेतला. नमुद आरोपी कडुन जप्त केलेल्या देशी दारू बॉबी संत्रा मालापैकी एक देशी दारू बॉबी संत्रा १८० एम.एल काचेची पावटी सी.ए.सॅम्पल करीता वेगळी काढुन त्यावर आमचे,पंचाचे व आरोपीचे सहीचे कागदी लेबल लावुन जागीच लाखने सिल केले. नमुद आरोपी शकिल खान वल्द वय ३० वर्ष रा. रा. कुरेशी नगर न.व.बडनेरा जि. अमरावती यांने मा. जिल्हाधिकारी साहेब यांचे आदेश क्र.कक्ष— २७/कलि/गृह विभाग/कावि—३५६/२०२० दिनांक ०१/०६/२०२० यांचे आदेशा अन्वये जिवनावश्यक वस्तु वगळुन सर्वप्रकारे फिरण्यास प्रतिबंध आहे हे माहिती असतांना सुध्दा नमुद आरोपीने कोरोणा बिमारी पसरविण्याचे उदेशाने अवैधरीत्या दारू बाळगुन पायदळ वाहतुक करीत असतांना व शासनाचे आदेशाचे उल्लंघन करीत असंताना मिळुन आल्याने नमुद आरोपी इसमाचे कुत्य कलम ६५ (ई) महा. दारूबंदी कायदा सहकलम १८८, २६९, २७० भादवि अन्वये उल्लंघन होत असल्याने नमुद आरोपी विरूध्द सदरचा गुन्हा दाखल करून तपसात घेतला. |
| तपास अधिकारी | नापोकॉ संतोष रामलाल यादव ब.नं. १८८ पोलीस स्टेशन बडनेरा अमरावती |

## २.प्रोव्हीशन

| | |
|---|---|
| पोलीस स्टेशन | पो.स्टे. फ्रेजरपुरा अमरावती शहर. |
| अप क्र. व कलम | अप नं. ५९०/२०२० कलम ६५ (अ) म.द.का. |
| फिर्यादि नाव व पत्ता | सरतर्फे पो. उप नि. बालाजी लालपालवाले पो.स्टे. फ्रेजरपुरा अम. शहर |
| घटनास्थळ | आशियाना क्लब पंचवटी चौक अमरावती |
| घटना ता. वेळ | दि. २६/०६/२०२० चे १४.०० वा. |
| दाखल ता. वेळ | दि. २६/०६/२०२० चे १७.५३ वा. |
| आरोपी | १.मुकेश मनोहर सरवरे वय ३४ वर्ष, २) सुनिल लक्ष्मणराव नायकवाड दोन्ही रा. वडाळी फ्रेजरपुरा अमरावती |
| हकीकत | हकीकत अशा प्रकारे आहे कि, यातील फिर्यादी यांची दि. २६/०६/२०२० रोजी सकाळी ०९.०० वा. चे १४.०० वा. पावेतो डी.ओ. ड्युटी असतांना गोपनीय माहीती मिळाली कि, दोन इसम होन्डा युनिकॉन गाडी क्र. MH २७ BC ०३७९ वर अवैद्यरीत्या दारु विक्री करित यशोदा नगर चौक कडुन चपराशीपुरा कडे येत आहे. अशा माहीती वरुन मा. पो.नि.सा. यांना माहीती दिली तसेच घटनास्थळ पंचनामा मधिल दोन पंचाना बोलावुन त्यांना सविस्थर माहीती देवुन स्टे.डा. ला नोंद क्र. २४/२०२० वेळ १३.२४ वा. नोंद करुन पो. स्टाफ सह रवाना होवुन चपराशीपुरा ते आशियाना क्लब पंचवटी चौक अमरावती या रोडवर सापडा रचला एक मोटरसायकल होन्डा युनिकॉन गाडी क्र. MH २७ BC ०३७९ यावर दोन इसम येतांना मिळुन आले त्यांना थांबवुन विचारले असता त्याचे जवळ असलेल्या एक कॉलेज बॅग ज्यामध्ये १) देशी दारु बॉबी संत्रा एकुण १०० नगर ९० ML च्या कि. अं. २६००/ रु. २) आय बी. इग्लिश दारु एकुण ८ नगर कि. अं. १८५०/ रु. , ३) ओ.सी. इग्लिश दारु एकुण ४ नग कि. अं. १४२०, ४) होन्डा युनिकॉन गाडी क्र. MH २७ BC ०३७९ कि. अं. ३५,०००/ रु. एकुण अंदाजे कि. ४०,८७०/ रु. चा माल दिसुन आला दोन्ही इसमास त्यांचे नाव गाव विचारले असता त्यांनी त्याचे नाव १) मुकेश मनोहर सरवरे वय ३४ वर्ष, २) सुनिल लक्ष्मणराव नायकवाड दोन्ही रा. वडाळी फ्रेजरपुरा अमरावती असे सांगीतले दोन्ही आरोपीस दारु वाहतुक व विक्री बाबत परवाना विचारला असता त्यांनी कोणताही परवाना नसल्याचे सांगीतले वरुन नमुद दोन्ही आरोपीवर कलम ६५ (अ) म.दा. का. प्रमाणे कार्यवाही करण्यात आली |
| तपासी अधिकारी | स.पो.उप नि. सुरेंद्र ढोके ब. नं. ६१८ पो.स्टे फ्रेजरपुरा अमरावती |